# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation


जा.क्र. : पुअहासोविसो/पवमूमं/२०२०/566 दिनांक : - 07/08/2020

## सुधारीत पत्र

प्रति
**मा. प्राचार्य / संचालक**
सर्व संलग्नीत महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय :- पारंपारीक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील अंतिम सत्र वगळून रिपीटर व ATKT असणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर घेण्याबाबत..**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/२०२०/५६५, दि.०६/०८/२०२०.**

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, कोव्हीड - १९ या जागतिक महामारीच्या प्रार्दुभावामुळे माहे मार्च / एप्रिल -२०२० च्या परीक्षा घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अंतिम वर्षातील अंतिम सत्र वगळून रिपीटर व ATKT असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विषय हा दि.०४/०८/२०२० रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या तातडीच्या बैठकीमध्ये ठेवला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**" पारंपारीक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील अंतिम सत्र वगळून रिपीटर व ATKT असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा या प्राचार्यांनी गोपनीय पध्दतीने पेपर सेटींग करून घेवून लेखी परीक्षा (सर्व संबंधीत पॅटर्नच्या म्हणजेच ४०, ७० व ८० मार्क्सच्या ) महाविद्यालयीन स्तरावर ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने घेवून व मुल्यांकन करुन गुण विद्यापीठाकडे विहीत नमून्यात भरुन दि.२८/०८/२०२० पर्यंत परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. "**

वरील ठरावानुसार अंतिम वर्षातील अंतिम सत्र वगळून रिपीटर व ATKT असणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्यांनी केवळ नापास झालेल्या विषयांकरिता ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयाच्या सोयीनुसार त्यांची परीक्षा घेवून त्याचे मूल्याकंन करुन गुण दिनांक २८/०८/२०२० पर्यंत विद्यापीठातील परीक्षा विभागास सादर करावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू **ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेत असताना कोणताही विद्यार्थी परीक्षेसाठी महाविद्यालयात उपस्थीत राहणार नाही, याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावी. तसेच रिपीटर व ATKT विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षामध्ये तात्पुरता प्रवेश देण्यात यावा.**

कळावे.

आपला स्नेहांकित,

(सीए श्रेणीक शाह)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ